महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

बुधवार ■ १६ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०२५ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# शुभांशू शुक्ला अंतराळातून पृथ्वीवर परतले

## पंतप्रधान मोदींनी केले शुभांशू शुक्ला यांचे अभिनंदन

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखील या खास प्रसंगी अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांचे अभिनंदन केले. "आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे भारताचे पहिले अंतराळवीर म्हणून शुभांशू शुक्ला यांनी धैर्य आणि समर्पण भावनेने अब्जावधी स्वप्नांना प्रेरणा दिली आहे. आपल्या स्वतःच्या मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेच्या दिशेने हा आणखी एक मैलाचा दगड आहे - गगनयान, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी X वर एक पोस्ट करत शुभांशूचे स्वागत केले.



**भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला 4 अंतराळवीरांसह पृथ्वीवर परतले आहेत. त्यांचे ड्रॅगन अंतराळयान कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर उतरले आहे. शुभांशू हे सुमारे 18 दिवस अवकाशात होते, या काळात त्यांनी अनेक प्रयोगही केले. शुभांशू शुक्ला हे 25 जून रोजी फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटर येथून फाल्कन 9 रॉकेटने अंतराळात गेले होते. आता ते सुखरूप पृथ्वीवर परतले आहेत.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली:** ॲक्सिओम-४ मोहिमेतून यशस्वीरित्या परतल्यानंतर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्लाच्या कुटुंबामध्ये आनंदाची लाट पसरली आहे. "मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण होऊन मुलगा सुखरूप परतला, आता कोणतीही भीती नाही" असे भावोद्गार शुभांशु शुक्ला यांच्या आईने काढले. तर त्यांच्या वडिलांनीदेखील आनंद व्यक्त करत सर्वांचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदींनी देखील शुभांशु शुक्ला यांचे अभिनंदन करत त्यांना अब्जावधी स्वप्नांचा प्रेरणास्थान म्हटले.

१८ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर राहिल्यानंतर भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला आज मंगळवारी पृथ्वीवर सुरक्षितपणे परतले. त्यांच्या या ऐतिहासिक मोहिमेनंतर संपूर्ण देशात उत्साहाचे वातावरण आहे. या खास प्रसंगी शुभांशूची आई आशा शुक्ला यांनी आनंदाश्रूसोबत आपला आनंद व्यक्त केला. "मुलगा खूप मोठे मिशन पूर्ण करून परतला आहे. तो कसा गेला आणि कसा परत आला हे पाहणेच खूप मोठी गोष्ट होती. मी सतत देवाला प्रार्थना करत होती की लँडिंग सुरक्षित व्हावे. आता सर्व भीती संपली आहे आणि मी पूर्णपणे निश्चिंत झाले आहे" अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या,

शुभांशूचे वडील शंभू दयाळ शुक्ला यांनीही आनंद व्यक्त करताना सांगितले की "या मोहिमेसाठी आमच्या मुलाला प्रोत्साहन आणि भरभरून आशीर्वाद देणाऱ्या सर्वांचे आम्ही आभार मानतो." शुभांशूच्या कुटुंबाने केक कापत त्यांच्या परतीचा आनंद साजरा केला.








## ठाणे पोलीस दलातील निरीक्षकांच्या बदल्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : गेल्याकाही दिवसांपासून ठाणे शहर पोलीस दलात प्रतिक्षेत असलेल्या पोलीस निरीक्षकांच्या बदल्या अखेर झाल्या आहेत. इतर जिल्ह्यातून आलेले पोलीस अधिकारी आता ठाणे पोलीस दलात रूजू होणार आहेत. तर ठाणे शहर पोलीस दलातील ३३ पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या देखील करण्यात आल्या आहेत. ठाणे शहर पोलीस दलातील नारपोली, मानपाडा या पोलिसांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या पोलीस ठाण्यात दहशदवादी विरोधी पथक आणि नागपूर शहर पोलीस दलातील अधिकारीच्या नेमणूक झाल्या.

पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरू झाले असून सोमवारी ठाणे पोलीस आयुक्तालयात इतर जिल्ह्यातून हजर झालेल्या पोलीस निरीक्षकांना अखेर त्यांच्या नेमणूकीच्या ठिकाणी नियुक्ती मिळालेली आहे. राज्य पोलीस नियंत्रण कक्षातील प्रियतमा मुठे यांची कासारवडवली पोलीस ठाण्यात बदली झाली आहे. मरोळी येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राचे मारूती आंधळे यांची खडकपाडा पोलीस ठाण्यात, म.सु.प.चे समाधान पाटील यांची निजामपूरा पोलीस ठाण्यात, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या माधवी राजेकुंभार यांची आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा, महामार्ग सुरक्षा पथकाचे प्रफुल्ल जाधव यांची पोलीस आयुक्त यांचे वाचक, पुणे शहर पोलीस दलातील शब्बीर सय्यद यांची अंबरनाथ पोलीस ठाणे, दहशतवादी विरोधी पथकाचे आनंदा पाटील यांची नारपोली पोलीस ठाण्यात, नागपूर शहरच्या मनीषा वर्षे यांची मानपाडा पोलीस ठाण्यात, मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालयातील राजेंद्र खेडकर यांची डोंबिवली पोलीस ठाणे, मुंबई शहरचे अतुल आहेर यांची शहर वाहतुक शाखा, नाशिक शहर पोलीस दलातील विक्रम मोहीते यांची भिवंडी शहर पोलीस ठाणे, मुंबई शहर पोलीस दलातील लक्ष्मण राठोड, राहुल सोनवणे, विठ्ठल चौगुले आणि शिवानंद देवकर यांची अनुक्रमे वागळे इस्टेट पोलीस ठाणे, सायबर पोलीस, कापूरबावडी पोलीस आणि वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात बदली झाली आहे.

### ठाणे जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील

## २२१ ग्रामपंचायतींकरिता तालुका निहाय आरक्षण जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

● बातमीदार

आज दिनांक 15-07-2025 रोजी ठाणे जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील 221 ग्रामपंचायत साठी सन 2025-2030 साठी तालुका निहाय खालील प्रमाणे आरक्षण काढणेत आले आहे

**1.कल्याण एकूण ग्रा पं-41**
अनुसूचित जाती साठी-3
अनुसूचित जमाती साठी-3
नागरिकांचा मागास प्रवर्ग -11
खुला प्रवर्ग साठी -24

**2.भिवंडी एकूण ग्रा पं -81**
अनुसूचित जाती -6
अनुसूचित जमाती -8
नागरिकांचा मागास प्रवर्ग -22
खुला प्रवर्ग -45

**3.मुरबाड एकूण ग्रा पं 71**
अनुसूचित जाती -2
अनुसूचित जमाती -4
नागरिकांचा मागास प्रवर्ग -19
खुला प्रवर्ग -46

**4.अंबरनाथ एकूण ग्रा पं 28**
अनुसूचित जाती -2
अनुसूचित जमाती -3
नागरिकांचा मागासप्रवर्ग -8
खुला प्रवर्ग -15

**5.शहापूर -पूर्णतः पेसा**



## आमदार किसन कथोरे यांच्या मागणीला यश
# टाटाच्या माध्यमातून बदलापूरला वीज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** गेल्या काही महिन्यांपासून गंभीर वीज समस्येला सामोरे जाणाऱ्या बदलापुरकरांच्या भविष्यातील वीज समस्येवर लवकरच पर्याय उपलब्ध होणार असून टाटा कंपनीच्या माध्यमातून बदलापूर शहराला वीज पुरवली जाणार आहे. टाटा पावर कंपनीच्या माध्यमातून १८० मेगाव्हॅट वीज पुरवण्यासाठी उपकेंद्राची उभारणी केली जाणार आहे.

त्यासाठी आगाऊ जागेची मागणी कंपनीने नोंदवली असून अटी शर्थीच्या अधीन राहून जागा ताब्यात घेण्यासाठी कंपनीने कुळगाव बदलापूर नगरपालिका प्रशासनाकडे त्यासाठीचा प्रस्ताव पाठवला आहे. त्यामुळे शहराला येत्या काळात अतिरिक्त वीज उपलब्ध होईल.

बदलापूर शहरात गेल्या काही वर्षात झपाट्याने लोकसंख्या वाढली. वाढत्या लोकसंख्येला पुरवण्यासाठी वीज आणि यंत्रणा अपुरी पडत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसात शहरातील वीज प्रश्न गंभीर बनला आहे. सातत्याने खंडीत होणारा वीज पुरवठा, देखभाल दुरूस्तीसाठी लागणारा वेळ, त्याचा ग्राहकांवर होणारा परिणाम आणि वाढणारा संताप गेल्या काही दिवसात प्रकर्षाने जाणवला.

वाढती लोकसंख्या आणि वीजेची मागणी यामुळे दरवर्षी उन्हाळ्यात चक्राकार पद्धतीने वीज बंद करून भार व्यवस्थापनाचा प्रयत्न केला जातो. यावर तोडगा म्हणून काही महिन्यांपूर्वी स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी शहराला टाटा कंपनीकडून पर्यायी वीज व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर टाटा पावर कंपनीनेही त्यावर सकारात्मक पाऊले उचलली. त्यानंतर या प्रकल्पासाठी टाटा कंपनीला जागेची आवश्यकता होती. कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या माध्यमातून क्रीडा संकुलासाठी आरक्षित असलेल्या आरक्षण क्रमांक १८ च्या सर्वेक्षण क्रमांक ४८ आणि ४९ भुखंडांवरील ३.७० एकर जागा देण्याची तयारी दर्शवली. सध्या त्याच्या वापर बदलाचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठवण्यात आला आहे.

### कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या

## सभापती व उपसभापतींनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पणन मंत्री जयकुमार रावल यांची भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

■ प्रतिनिधी

मुंबई : कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र घोडविंदे यांनी आमदार किसन कथोरे यांच्या सोबत पणन मंत्री जयकुमार रावल आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बाजार समितीच्या विकासाबाबत चर्चा केली, यावेळी माजी आमदार नरेंद्र पवार,उपसभापती जालिंदर पाटील, समाजसेवक साकिब गोरे उपस्थित होते. यावेळी दोन्ही मंत्र्यांनी नवनियुक्त सभापती आणि उपसभापतींना शुभेच्छा दिल्या.














## भारतात टेस्लाचे पहिले शोरुम

### ६० लाखांमध्ये मिळणार जबरदस्त कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जगातील सर्वात लोकप्रिय इलेक्ट्रीक व्हिकल कंपनी टेस्लाने भारतात पाऊल ठेवले आहे. टेस्लाने मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स (बीकेसी) मध्ये देशातील पहिले शोरुम उघडले आहे. भारतीय ईव्ही मार्केटमध्ये ही कंपनीची दमदार एन्ट्री आहे. टेस्ला Model Yची किंमत, फीचर्स सर्व काही जाणून घेऊ या. भारतात टेस्लाची सुरुवात Model Y SUV पासून होत आहे. त्याच्या Model Y Rear-Wheel Drive ची किंमत जवळपास ६० लाख रुपये आहे. तसेच दुसरे व्हेरिएंट Long Range Rear-Wheel Drive ची किंमत ६८ लाख रुपये आहे. या कार टेस्लाच्या शंघाई येथील कंपनीतून भारतात आणल्या जात आहे. कंपनीने ८.३ कोटी रुपयांची एक्सेसरीज, सुपरचार्जर आणि इक्विपमेंटसुद्धा चीन आणि अमेरिकेतून भारतात आयात केले आहेत. हे सुपरचार्जर मुंबईच्या जवळपासच्या भागात लावण्यात येणार आहे. ज्यामुळे ग्राहकांची सुविधा होणार आहे.

**भारतात किंमत जास्त का?**

टेस्लाचे सर्वात प्रसिद्ध Model Y SUV भारतात शंघाईमधून आयात केले जात आहे. त्याच्यावर मोठ्या प्रमाणावर आयात शुल्क लागले आहे. प्रत्येक कारवर जवळपास २१ लाख रुपयांपेक्षा जास्त कर द्यावा लागत आहे. भारतात ही कार तयार झाली असती तर तिची किंमत ४० हजार डॉलरपेक्षाही (जवळपास ३५ लाख) कमी असती. कारण त्यावर सरळ ७० टक्के कर लागला असता. परंतु दुसऱ्या देशातून आयात केली जात असल्याने ही कार भारतात महाग आहे.



## गीतासार



**अध्याय १६**
**दैवासुरसम्पद्विभागयोगः**

तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् । क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥ १६-१९ ॥

त्या द्वेष करणाऱ्या, पापी, क्रूरकर्मे करणाऱ्या नराधमांना मी संसारात वारंवार आसुरी योनींतच टाकतो. ॥ १६-१९ ॥

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि । मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ॥ १६-२० ॥

हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), ते मूढ मला न प्राप्त होता जन्मोजन्मी आसुरी योनींतच जन्मतात. उलट त्याहूनही अतिनीच गतीला प्राप्त होतात. अर्थात घोर नरकांत पडतात. ॥ १६-२० ॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः । कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ १६-२१ ॥

काम, क्रोध आणि लोभ ही तीन प्रकारची नरकाची दारे आत्म्याचा नाश करणारी अर्थात त्याला अधोगतीला नेणारी आहेत. म्हणूनच त्या तिन्हींचा त्याग करावा. ॥ १६-२१ ॥

एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः । आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥ १६-२२ ॥

हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), या तिन्ही नरकाच्या दारांपासून मुक्त झालेला पुरुष आपल्या कल्याणाचे आचरण करतो. त्याने तो परम गती मिळवितो. अर्थात मला येऊन मिळतो. ॥ १६-२२ ॥

# बारा पराक्रम स्थळे युनेस्कोच्या व्यासपीठावर







महाराष्ट्र हा केवळ सह्याद्रीच्या कड्याकपारींनी नटलेला प्रदेश नाही, तर तो इतिहासाचा, पराक्रमाचा आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेचा साक्षीदार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली गड-किल्ल्यांची शृंखला आजही त्यांच्या शौर्याच्या कथा सांगत उभी आहे. अशा १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्को या जागतिक संस्थेच्या जागतिक वारसा स्थळ मानांकनाची शिफारस झाल्याने महाराष्ट्राच्या गौरवात भर पडली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. सोबतच सामान्य जनतेने देखील गड-किल्ल्यांवर जाऊन आपला आनंद व्यक्त केला. आपला इतिहास प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक असतेच. या शिवाय इतिहासातून लढण्याची प्रेरणा मिळते. भविष्याची रणनीती ठरवण्याची दिशा मिळते. येणाऱ्या पिढ्यांना आपल्या पूर्वजांसह जुनी संस्कृती अभ्यासाता येते. त्यामुळे ऐतिहासिक दुर्ग आपले कायम प्रेरणास्त्रोत आहेत. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात निर्माण झालेले हे दुर्ग महाराष्ट्राच्या सर्वसामान्यांच्या नेतृत्वाच्या दूरदृष्टीची साक्ष देणारे ठरते. सोबतच अल्प आयुष्यात सुद्धा जबरदस्त इच्छाशक्ती असेल तर तुम्ही भीम पराक्रम जगापुढे ठेवू शकता. हजारो वर्ष येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन करू शकता असा वस्तूपाठ छत्रपती शिवरायांच्या या 12 किल्ल्यांनी महाराष्ट्राला, देशाला दिला होता. आता हा दूरदृष्टीचा वारसा यानिमित्ताने जागतिक झाला आहे.

### युनेस्को ; कार्य आणि भूमिका

युनेस्को (United Nations Educational, Scientific and Cultural Organization) या संस्थेची स्थापना १६ नोव्हेंबर १९४५ रोजी पॅरिस (फ्रान्स) येथे झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीच्या माध्यमातून शांतता व सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली. युनेस्कोचा उद्देश म्हणजे जगातील सांस्कृतिक आणि नैसर्गिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांचे जतन करणे, जपणे आणि जागतिक समुदायात त्यांची ओळख निर्माण करणे. यासाठी "World Heritage Convention, 1972" तयार करण्यात आले.

भारताने १९७७ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा करारावर स्वाक्षरी केली. तेव्हापासून अनेक स्थळांना या यादीत मान्यता मिळाली आहे. सध्या भारतात जवळपास ४२ जागतिक वारसा स्थळे आहेत (२७ सांस्कृतिक, ७ नैसर्गिक, १ मिश्र स्वरूपाची व इतर प्रस्तावित).यामध्ये राजस्थानच्या गडकिल्ल्यांचाही सहभाग होता. महाराष्ट्राचे गड किल्ले मात्र दुर्लक्षित होते. यानिमित्ताने त्याकडे जागतिक लक्ष वेधले गेले आहे. भारतातील स्थळांची शिफारस केंद्र सरकार अंतर्गत भारतीय पुरातत्व विभाग करतो. राज्य सरकार, स्थानिक संस्था आणि तज्ज्ञांच्या मदतीने केंद्र सरकार युनेस्कोला प्रस्ताव सादर करते.

### पराक्रमाच्या १२ यशोगाथा

महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूमधील जिंजी किल्ला अशा एकूण १२ किल्ल्यांना युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यासाठी नामनिर्देशन देण्यात आले आहे. हे सर्व किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे जिवंत प्रतीक आहेत. स्वराज्याच्या राजधानीचा किल्ला रायगड, शिवाजी महाराजांचा सर्वात प्रिय किल्ला राजगड, अफझलखानाचा वध ज्या ठिकाणी झाला तो प्रतापगड, महाराजांच्या पराक्रमाचा साक्षीदार पन्हाळा, महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी, भक्कम डोंगररांगेवर वसलेला आणि लष्करी दृष्टिकोनातून महत्त्वाचा लोहगड, मराठ्यांनी पहिला मोठा विजय मिळवलेला किल्ला साल्हेर, सागरी संरक्षणासाठी बांधलेला दुर्ग सिंधुदुर्ग, सागरी दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा सुवर्णदुर्ग, सागरी लढायांचे केंद्र विजयदुर्ग आणि मुंबई किनाऱ्याजवळील सागरी संरक्षणकवच असलेला खांदेरी किल्ला. तर तामिळनाडू राज्यातील दक्षिणेकडील रणभूमीवर मराठ्यांनी ताबा मिळवलेला जिंजी किल्ल्याचा यात समावेश आहे.

### तत्कालिन युद्धनीतीचे शिलालेख

महाराष्ट्रातील हे बारा किल्ले आपल्या शेकडो युद्धनीतीच्या प्रात्यक्षिकांसह उभे आहेत.हे वास्तुकलेचे प्रत्यक्ष दर्शन असले तरी जगाला आपल्या दगडांच्या कवितेतून तत्कालीन युद्धनीतीला सांगणारे उत्तम प्रतीचे जणू शिलालेख ही आहे.थोडक्यात, प्रत्येक किल्ल्याकडे आपली एक गाथा आहे.जगाला नवल वाटेल अशी रोचक प्रत्येकाची कथा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील हे किल्ले राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अनमोल आहेत. प्रत्येक किल्ल्याचे वैशिष्ट्य स्वयंपूर्ण असून जागतिक पर्यटकांना देखील तत्कालीन युद्धनीतीची माहिती देणारे आहे. सह्याद्रीच्या कठीण डोंगररांगांवर आणि किनाऱ्यावर ही किल्ले बांधण्यात आली, ज्यामुळे शत्रुपासून संरक्षण अधिक प्रभावी झाले. मराठा स्थापत्यकलेतील माची एक वैशिष्ट्य – किल्ल्याच्या टोकाला किंवा बाहेरील भागात असलेले बुरुजयुक्त संरक्षण. अशा माच्या जगातील इतर कुठल्याही किल्ल्यांमध्ये दिसत नाहीत.

शत्रूला सहज लक्षात न येणारे वळणदार, सुरक्षित दरवाजे ही एक विलक्षण प्रवेशद्वारांची रचना आहे. गनिमी कावा अर्थात गुरीला युद्ध नीती मध्ये अशी रचना किती आवश्यक असते याचेही महत्त्व या रचनेवरून कळते. हे किल्ले केवळ लढायांचे ठिकाण नव्हते, तर स्वराज्य संकल्पनेचा प्रचार करणारी केंद्रेही होती. युनेस्को अद्वितीय वैश्विक मूल्य या निकषावर आधारित स्थळांची निवड करते. यामध्ये ऐतिहासिक महत्त्व आणि वैभवशाली परंपरा, स्थापत्यशास्त्रातील वैशिष्ट्यपूर्ण रचना, जगात अन्यत्र न आढळणारा अद्वितीय स्वरूप, मानवतेच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासाशी असलेली नाळ, संरक्षणाची अवस्था आणि व्यवस्थापन हे पाच गुणधर्म पाहिले जातात.या निकषांवर महाराष्ट्रातील किल्ले पूर्ण उतरतात, म्हणूनच यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्यासाठी युनेस्कोच्या यादीत समावेश झाला आहे.

### शिवरायांचा प्रताप जगव्यापी

या मान्यतेमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य जगासमोर अधिक प्रभावीपणे मांडता येईल. त्यांच्या युद्धनीतीचा जागतिक स्तरावरील युद्धांच्या युद्धनीती सोबत अभ्यास होईल. जगाच्या पटलावर एका महान योद्धाच्या पराक्रमाचे चिंतन,मंथन होईल. हे फक्त महाराष्ट्राच्याच नाही तर भारताच्या सन्मानाचे लक्षण आहे. जागतिक पर्यटक देखील या ठिकाणी आकर्षित होतील, ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही उभारी मिळेल. १२ पराक्रम स्थळांचे युनेस्कोच्या व्यासपीठावर आगमन होणे ही महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानाची घटना आहे. हे फक्त वास्तुकलांचे प्रतिनिधी नसून, स्वातंत्र्याची, धैर्याची आणि एकीची अमूल्य प्रतीके आहेत. यामुळे शिवरायांचे विचार, त्यांचे शौर्य आणि त्यांची दूरदृष्टी नव्या पिढीपर्यंत पोहोचेल, आणि जगातील इतिहासात भारताचे स्वाभिमानी पान अधिक उजळून निघेल.

**- प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

# गायमुख घाट रस्ता दुरुस्तीसाठी कॉंक्रिट प्रयोग करा

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : काजू पाडा, चेना गाव ते गायमुख घाट या रस्त्याची स्थिती अतिशय खराब झाली आहे. नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यावर केलेली दुरुस्ती पावसाळ्यात टिकून राहावी यासाठी, रॅपिड हार्डनिंग कॉंक्रिटचा प्रयोग करून या घाट रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, असे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.




फाऊंटन हॉटेल ते गायमुख घाट या ठाण्याच्या दिशेने येणाऱ्या रस्त्याची स्थिती अतिशय बिकट आहे. त्यावर खडी टाकून, डांबराने ग्राऊटींग केल्यावरही हा रस्ता वारंवार उखडला जात आहे. त्यामुळे या पट्ट्यात सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक मंदावते. वाहने उलट्या दिशेने येऊ लागतात. गर्दीच्या वेळी येथील वाहतूक कोंडीचा परिणाम मुंबई-अहमदाबाद रोडवर चिंचोटीपर्यंत जाणवतो. तसेच, मिरारोडपर्यंतही वाहनांचा खोळंबा होत असल्याची माहिती पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट यांनी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या बैठकीत दिली. त्यावर, या रस्त्याचा मूळ ढाचा वाहून गेला असल्याने तेथे कोणतीही उपाययोजना टिकत नाही. मात्र, वाहतुकीच्या सोयीसाठी वारंवार रस्त्याची दुरुस्ती करत असल्याची माहिती मीरा-भाईंदर महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंत्यांनी दिली. त्यासंदर्भात, पावसाळा असल्याने खड्डे भरताना रॅपिड हार्डनिंग कॉंक्रिटचा वापर करण्याची सूचना नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांनी केली. रॅपिड हार्डनिंग कॉंक्रिटचा प्रयोग मीरा-भाईंदर महापालिकेने तत्काळ करून पाहावा. हे कॉंक्रिट कमीत कमी वेळात एकजीव होते. त्यामुळे रस्ता बंद न करता दुरुस्ती करणे शक्य होते. नागरिकांना घाट रस्त्याच्या स्थितीमुळे खूप मनस्ताप सहन करावा लागत आहे. हा प्रयोग यशस्वी झाला तर घाट परिसर लगेच त्याच पद्धतीने दुरुस्त करून वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल, असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले. उपलब्ध सर्व यंत्रणेचा वापर करून स्थानिक पोलिसांशी समन्वय साधून चार तासांच्या अवधीत एखाद्या मार्गिकेवरील पट्ट्यात हा प्रयोग करावा, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात झालेल्या या बैठकीस, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, उपायुक्त दिनेश तायडे, उपनगर अभियंता विकास ढोले, घोडबंदर रोडचे समन्वयक कार्यकारी अभियंता संजय कदम यांच्यासह मिरा-भाईंदर महापालिका, एमएमआरडीए, वन विभाग यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

याच बैठकीत, घोडबंदर रस्त्यावरील सेवा रस्ता आणि मुख्य रस्ता यांच्या एकत्रीकरणाचे काम पावसाळ्यामुळे थांबलेले आहे. काही ठिकाणी एकत्रीकरण झाले असले तरी मूळ रस्ता आणि नवीन रस्ता यांच्यात काही ठिकाणी अंतर पडले आहे. त्यामुळे संपूर्ण घोडबंदर रस्त्याची एमएमआरडीएने लगेच पाहणी करून आवश्यक तेथे रस्ता एकसमान करावा आणि दुरुस्ती करावी. त्याचबरोबर, सार्वजनिक बांधकाम विभागाने कासारवडवली सिग्नल, ओवळा सिग्नल, कापूरबावडी उड्डाणपूल येथील रस्त्याची दुरूस्ती तत्काळ पूर्ण करावी, असेही निर्देश आयुक्त राव यांनी दिले.

# महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसिंचन क्षमता वाढवली जाईल

**- मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसिंचनाची क्षमता वाढवण्यासाठी शासन गंभीर असून, त्यासाठी महत्त्वाची पावले उचलण्यात येत आहेत, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे -पाटील यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले.

सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी अर्धा तास चर्चेत वाढत्या पाण्याची मागणी पूर्ण करण्याची सूचना केली होती, त्यावेळी मंत्री श्री.विखे - पाटील यांनी माहिती दिली. विखे-पाटील म्हणाले की, कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठी अंदाजे 21 टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. यासाठी 115 टीएमसी पाण्याच्या फेरजल नियोजनाचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच, उजनी धरणातून 23.7 टीएमसी पाणी धाराशिव जिल्ह्यात वळवले जाणार आहे. या भागातील काही तालुक्यांमध्ये उपसा सिंचनाद्वारे पाणीपुरवठा केला जाईल.

या प्रकल्पासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने 'महाराष्ट्र रेसिलियन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (MIDP)' राबवण्यात येत आहे. फ्लड डायव्हर्जन ही यामधील मुख्य योजना असून, 13 मार्च 2024 रोजी त्याला मान्यता देण्यात आली आहे. दोन महिन्यांच्या कालावधीत पूराच्या पाण्याचा उपयुक्त वापर होईल, असे त्यांनी सांगितले.


प्रकल्पाचा सर्वेक्षण अहवाल लवकरच अपेक्षित असून, पुढील पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. कृष्णा खोऱ्यातून भीमा खोऱ्यात सुमारे 55 टीएमसी पाणी आणण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सर्व्हेक्षण झाल्यानंतर वस्तुस्थिती सादर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांच्या प्रकल्पावर सुमारे 4000 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, परंतु जागतिक बँकेच्या निधीमुळे आता अडथळा उरलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. यावर्षी प्रकल्पाच्या निविदा निघतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच, उजनी, जायकवाडी, कोयना आदी धरणांमधील गाळ काढण्यासाठी नवीन धोरण तयार करण्यात येत आहे. हे धोरण लवकरच मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येणार असून, मान्यता मिळवण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

बॅरेजेसबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, उजनी धरणाचे 24-25 टीएमसी पाणी वाहून जात होते. सोलापूर महापालिकेसाठी स्वतंत्र पाईपलाईन उपलब्ध झाल्याने आता नदीपात्रात पाण्याचा प्रवाह थांबेल. त्यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांसाठी जलसिंचन अडचणीत येऊ नये म्हणून भीमा नदीवर 11 नवीन बॅरेजेस प्रस्तावित करण्यात आले असल्याचे जलसंपदा मंत्री यांनी यावेळी सांगितले.

## आरोग्य

### केसांत कोंडा होण्याची समस्या अशी घालवा



डँड्रफ फक्त कोरड्या स्काल्पमुळे होत नाही, तर त्यामागे एक विशेष फंगल इन्फेक्शन असतं. मलसेझिया नावाच्या फंगसची वाढ झाल्यास ही समस्या वाढते. पण ओवामध्ये असणारा थायमॉल नावाचा घटक फंगल वाढ थांबवतो आणि खाज, जळजळ यावर आराम देतो. ओव्याचे अँटी-बॅक्टेरियल गुण स्काल्पला स्वच्छ ठेवतात. २०२० साली जर्नल ऑफ एथ्नोफार्माकोलॉजीमध्ये छापलेला अभ्यास सांगतो की, ओव्याचे तेल फंगल इन्फेक्शनवर प्रभावी ठरते. त्यामुळे केसांतील कोंडा नैसर्गिक पद्धतीने दूर होऊ शकतो.

**ओवा + कडुलिंब हेअर मास्क**

ओवा आणि कडुलिंब दोघेही फंगल इन्फेक्शनविरोधात प्रभावी आहेत. दोघांना एकत्र वापरल्यास अधिक परिणामकारक हेअर मास्क तयार होतो. यासाठी, २ चमचे ओवा रात्रभर पाण्यात भिजवा. दुसऱ्या दिवशी त्यात ८–१० कडुलिंबाची पाने घालून पेस्ट तयार करा. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून स्काल्पवर लावा. ३० मिनिटांनी सौम्य शाम्पूने केस धुवा. आठवड्यातून दोनदा हा उपाय केल्यास डँड्रफ लक्षणीयरित्या कमी होतो.

# आगरी,कोळी, मराठी बांधवांनो तिसरी मुंबई येत आहे संधी चे सोने करा - सी.आर.म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे.मुंबई महानगर पालिका म्हणे पर प्रांतीय यांच्या हातात जाणार आहे. कारणच तसे आहे,मीरा भाईंदर येथील मोर्चा यांचेच प्रतीक आहे, ताकद आहेच कारण आमचा मराठी टक्का १० ते १५ वर घसरला आहे,दूरदृष्टीचा अभाव हेच बहुदा कारण असावे.मुंबईत नोकऱ्या आपल्या दिसतात पण आर्थिक नाडी मात्र परप्रांतीयांचा हातात.पुण्यामध्ये मराठी माणूस कानाकोपऱ्यातून गेला आणि स्थायिक झाला तसा ओघ मात्र मुंबईत झाला नाही,उलटपक्षी मुंबईतून माणूस गावात आला.दळणवळणाच्या साधनांमुळे त्यांनी शहर सोडले मात्र बाहेरील लोक येऊन मिळेल त्या ठिकाणी राहून संधीचे सोने केले,जागा काबीज केल्या.रेल्वे पटरी,सरकारी जागा,पडीक जागा त्यावर स्थायिक झाले.मात्र आत्ता काही काळानंतर मराठी माणूस शोधावा लागेल, एके काळी आगरी,कोळ्याची मुंबई आत्ता मोजक्याच ठिकाणी दिसते आहे.तो प्रामाणिक म्हणून अतिक्रमण करून जागा बळकावू शकेल नाही. पेशावर,तंजावर या ठिकाणी मराठी झेंडा फडकवला होता.मात्र आमच्याच हक्काच्या भूमीत आमचा मराठी आगरी,कोळी टक्का टिकू शकत नाही ही शोकांतिका अशी खंत वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर.म्हात्रे यांनी व्यक्त केली.

आज हा परप्रांतीयांचा लोंढा ग्रामीण भागात आला आहे.सर्व शहरी ग्रामीण बाजारपेठा आपल्या ताब्यात घेत आहे. त्यांच्या यशाचे गमक म्हणे सकाळी लवकर दुकाने,व्यवसाय सुरू करून उशिरा पर्यंत चालू ठेवणे, ना सण ना उत्सव. मराठी माणसाचा व्यवसाय कोठे जास्त चालतो त्याच ठिकाणी मोठा डिपॉझिट देऊन भाड्याने दुकान घेणे आणि मालकाला पैसा परत न आल्यामुळे त्या दुकानाची मालकीचं आपल्याकडे घेणे .यातून आपला माणूस मागे पडत आहे. ग्रामीण भागात मोक्याच्या ठिकाणी मॉल आइस्क्रीम दुकाने यांनी सुरू केलीत,बांधकाम मोठ्याप्रमाणात सुरू झालेत,यासाठीचे साहित्य,कामगार,आर.सी.सी.बांधकाम पासून ते रंगकामापर्यंत हेच कामगार पुरवतात,आपल्या मुलांकडे कौशल्य नसल्याने बिगारी म्हणून,मदतनीस म्हणून काम करावे लागते यासाठी ही कामे आपल्या तरुणांनी शिकून घेतली पाहिजे.कारण यामध्ये फुटावर पैसा मिळतो.

सरकारचे भविष्यातील ध्येय धोरणे याचा विचार करता.महामुंबई यात अनेक रोजगाराच्या संधी निर्माण होणं आहेत.मुंबई उपनगर,नवी मुंबई,नैना, MMRDA, यात मोठ्याप्रमाणावर रोजगार संधी असणार,नैना स्मार्ट सिटी,पेण,पनवेल,उरण,कर्जत येथे विसरणार आहे. ही संधी परप्रांतीयांच्या हातात जात काम नये.

MMRDA चे विस्तारित रूप,पाहता बांधकाम क्षेत्रात मोठी संधी असणार,अटल सेतूमुळे मुंबई तासाभराच्या अंतरावर आली आहे. चिर्ले ते पेण पर्यंतचा विकासाचा मार्ग खुला झाला आहे.मुंबई छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ याचा ताण कमी करण्यासाठी भविष्यातील स्वर्गीय दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होईल कारण यासाठी सुमारे १६ हजार ७०० कोटी खर्च केला असून, २हजार८६७ एकरावरील ही विमानतळ म्हणजे आजूबाजूला रोजगाराची संधी मिळवणार आहे मात्र आपला मराठी,आगरी,कोळी टक्का दिसला पाहिजे.जेएनपीटी बंदराची जागा पालघर येथील वाधवन बंदर यासाठी ७६ हजार२०० कोटी खर्च केला आहे आणि येथे चौथी महामुंबई बसणार आहे येथे पण रोजगार संधी आहेच,आपला विभाग प्रगती करत असताना आपण टिकून राहिले पाहिजे. नवीमुंबई क्षेत्रात २५० एकरावर एडुसिटी (EduCity) आंतरराष्ट्रीय नावाजलेली १० विद्यापीठे स्थापन होणार आहेत,इंग्लंड २, ऑस्ट्रेलिया१,अमेरिका ,इटली १, यांना मान्यता मिळालेली आहे बाकीचे प्रयत्नशील आहेत, एवढी मोठी शिक्षणाची कवाडे खुलणार आहेत.

**जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण**
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी.
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in



## आजचे राशि भविष्य



**मेष**
अशी एखादी व्यक्ती भेटेल जिच्याकडून तुम्हाला काहीतरी शिकायला मिळेल. ऑफिसच्या काही कामांमुळे अचानक प्रवास करावा लागू शकतो.

**वृषभ**
कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत संयम राखाल आणि तुमच्या परिस्थितीत लवकरच सुधारणा होताना दिसेल. तुमच्या यशाचा मार्ग सापडेल.

**मिथुन**
तुम्ही काही महत्त्वाचे निर्णय घेऊ शकता जे तुमची आर्थिक स्थिती आणि घरातील व्यवस्था राखण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

**कर्क**
एकत्रितपणे केलेल्या कामात तुम्हाला मोठ्या प्रमाणात यश मिळेल.वडिलांचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहतील. उर्जेने खूप काही साध्य कराल.

**सिंह**
फक्त तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. आज एखाद्या खास व्यक्तीच्या मदतीने तुमची प्रलंबित कामे पूर्ण होतील.काम पूर्ण गांभीर्याने होईल.

**कन्या**
घरातील वरिष्ठांचेही सहकार्य मिळेल. कामाच्या ठिकाणी वास्तुचे नियम पाळल्यास सकारात्मक परिणाम मिळतील.आरोग्य निरोगी राहील.

**तूळ**
कोणाशीही विनाकारण वाद घालू नका. यामुळे संबंध बिघडेल आणि तुमचे कामही विस्कळीत होईल. तुम्ही काही महत्त्वाच्या बाबींवर निर्णय घेऊ शकता.

**वृश्चिक**
तुम्हाला धार्मिक आणि सामाजिक कार्यात रुची असू शकते. कोणतीही योजना कृतीत आणली तर कोणतेही ध्येय साध्य होईल आणि मन प्रसन्न राहील. धार्मिक

**धनु**
कार्यात तुमची आवड वाढेल. कामात व्यस्त राहा आणि अनावश्यक कामात रस घेऊ नका. आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल आहे.

**मकर**
कोणताही निर्णय घेण्यात आराम वाटेल.आपल्या कुटुंबासाठी थोडा वेळ काढल्याने नात्यात गोडवा येईल. कामाचे परिणाम अनुकूल असतील.

**कुंभ**
घरात सुख-शांतीचे वातावरण राहील.दिवस तुमच्यासाठी सुवर्ण दिवस असणार आहे. घरात निवांत आणि शांततापूर्ण वातावरण असेल.

**मीन**
तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. तुम्हाला कामात जास्त मेहनत करावी लागेल, कामाची कार्यक्षमता कमी होऊ देऊ नका. व्यक्तिमत्व सुधारेल.

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
**जीवनदीप महाविद्यालय, गोवेली**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558



## वसई-विरार मनपाची
# शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक सेवा बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसई-विरार महापालिकेने महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात वाहतूक सेवा उपलब्ध करून दिली होती. पण गेल्या काही काळापासून ही बससेवा बंद असल्यामुळे याचा फटका विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना बसत आहे. त्यामुळे ही सेवा तातडीने पुन्हा सुरू करण्याची मागणी होत आहे.

वसई-विरार महापालिकेच्या परिवहन विभागातर्फे शाळकरी मुलांच्या सोयीसाठी विशेष बससेवा सुरु करण्यात आली होती. महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत सवलतीच्या दरात ही योजना विद्यार्थ्यांना पुरवली जात होती. पण, गेल्या काही काळापासून ही विशेष बससेवा बंद असल्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. तर महापालिकेने लागू केलेल्या नव्या अटी शर्तीमुळे बससेवा बंद केल्याचे ठेकेदाराचे म्हणणे आहे.

वसई पूर्वेतील संत जलाराम बापू नगर, मिठागर हा आर्थिकदृष्ट्या कमकुवत नागरिकांचा भाग समजला जातो. या भागातील बहुतांश नागरिक हे फेरीवाला, मजूर गटातून येणारे तसेच धुणी भांडी करून उदरनिर्वाह करणारे आहेत. वसई पश्चिमेतील एम. के. गुजराथी शाळेत संत जलाराम बापू नगर येथील ७५ तर मिठागर परिसरातील ४० ते ५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पण, विशेष बससेवा बंद असल्यामुळे गेले १५ दिवस या विद्यार्थ्यांना शाळेत जाताना अडचणी येत असल्याने शिवसेना (ठाकरे) माजी नगरसेविका किरण चेंदवणकर यांनी सांगितले आहे.

सध्या महापालिकेच्या अन्य बससेवेतील वाढती गर्दी आणि विस्कळीत वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांना त्यातून प्रवास करणे कठीण झाले आहे. शिवाय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या पालकांना आपल्या पाल्यांना दररोज खासगी बसने किंवा रिक्षाने शाळेत पाठवणे परवडणारे नाही. त्यामुळे, महानगरपालिकेने ही विशेष बससेवा तातडीने पूर्ववत करावी, अशी मागणी ही चेंदवणकर यांनी पालिकेकडे केली आहे. वसई विरार महापालिकेच्या परिवहन विभागाकडून शाळेच्या विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात बस प्रवास उपलब्ध करून दिला जात असल्याचा दावा पालिकेच्या परिवहन विभागाने सांगितले आहे. मात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या विभागातून ते शाळेपर्यंत बस सेवा देण्याची मागणी होत आहे. मात्र त्यात अडचणी येत आहेत. याबाबत ठेकेदार यांच्यासोबत देखील चर्चा सुरू असल्याचे परिवहन विभागाचा अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# डॉ. आंबेडकर स्मारकाजवळील बेकायदा बांधकामाला केडीएमसीची नोटीस



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेत काटेमानिवली भागात ड प्रभाग कार्यालयाजवळ २१ कोटी रूपये खर्च करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यात आले आहे. या स्मारकाशेजारी एका खासगी संस्थेने बांधकाम करून स्मारकाच्या सौंदर्यात बाधा आणली आहे. यासंदर्भात पालिकेकडे तक्रार प्राप्त होताच, ड प्रभागाचे साहाय्यक आयुक्त उमेश यमगर यांनी संबंधित संस्थेला नोटीस बजावली आहे.

ही नोटीस मिळताच स्मारकाजवळील बांधकाम काढून घेण्याचे संस्थेला सूचित करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन समिती आणि आंबेडकरी जनतेच्या पाठपुराव्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून कल्याण पूर्वेत काटेमानिवली भागात डॉ. आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभे राहिले आहे. विविध भागातून नागरिक याठिकाणी येतात.

या देखण्या कलाकृतीच्या बाजुला आंबेडकर स्मारकाच्या सौंदर्याला बाधा येईल अशा पध्दतीने एका खासगी संस्थेने एक निवारा उभा केला आहे. यासंदर्भात अनेक जाणकार नागरिक, माहिती कार्यकर्ते विनोद तिवारी यांनी हा विषय पालिका अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणला. या निवाऱ्याच्या ठिकाणी नंतर पक्के बांधकाम उभे राहू शकते, अशा शक्यता अनेक नागरिकांनी व्यक्त केल्या. हे बांधकाम नंतर त्या ठिकाणाहून हटविणे अवघड होईल, असे काही नागरिकांनी पालिका अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले.

स्मारकाशेजारील बांधकामाच्या वाढत्या तक्रारी येऊ लागल्याने साहाय्यक आयुक्त उमेश यमगर यांनी बीट मुकादमांसह या बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी केली. हे बांधकाम पालिकेच्या कोणत्याही परवानग्या न घेता उभारले असल्याचे निदर्शास आल्यावर यमगर यांनी हे बांधकाम करणाऱ्या खासगी संस्थेला नोटीस बजावली आहे. हे बांधकाम स्वताहून काढून घेण्याचे नोटिसीत बजावले आहे. अन्यथा आपल्या पध्दतीने पालिका हे बांधकाम हटविणार आहे.

## उल्हासनगर महानगरपालिका
### प्रभाग समिती क्र. ४

**नोटीस**

(महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८(३) अन्वये) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती क्र. ४ चे हद्दीत खाली नमुद केलेल्या ठिकाणी झाडाच्या फांद्या छाटणेसाठी प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | ठिकाण | झाडाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | झाडाची जात | फांदयाचा संख्या | फांदयाची लांबी | फांदयाचा व्यास |
| १ | श्री. राजु प गिरी | ब्लॉक सी ९३६, न्यु इग्लीस स्कुल समोर कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर-४ | जंगली | १ | सुमारे १२ फुट | ६ इंच |
| | | | | १ | सुमारे ९ फुट | ४.४ इंच |
| | | | | १ | सुमारे ८ फुट | ५.४ इंच |

उक्त नमुद केलेल्या ठिकाणी असलेले वृक्ष छाटण्यासाठी कोणत्याही इसमाची हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात दिनांक १८/०७/२०२५ पूर्वी सहायक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४, अग्निशमन इमारत, उल्हासनगर-४२१००५ या कार्यालयात सादर करावी. मुदतीत लेखी हरकत प्राप्त झाल्यास संबधितास सुनावणी देऊन अंतीम निर्णय घेतला जाईल, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास प्रस्तुत प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जावक क्रमांक : उमपा/सहा.आ/प्र.स.४/४८२/२०२५ सहायक आयुक्त, प्रभाग समिती ४ कार्यालय, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर-४२१००५. दिनांक : ११/०७/२०२५
जावक क्रमांक : जा.क्र. उमपा/पीआरओ/१९३/२०२५ दिनांक:- १५/०७/२०२५

सही/-
(अलका पवार)
वृक्ष अधिकारी तथा सहायक आयुक्त
प्रभाग समिती क्र. ४ उल्हासनगर महानगरपालिका

# रिक्त पदांमुळे ठाणे मनपा अधिकाऱ्यांवर कामाचा दुहेरी ताण

## आरोग्यावर परिणाम

**सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्यांची निम्मी पदे रिक्त आहेत. त्यामुळे कार्यरत अभियंत्याना दुहेरी पदाचा ताण सहन करावा लागत आहे. काही महिन्यांपूर्वी एका अभियंत्यांला हृदयविकाराचा झटका आला होता, त्यातून ते बचावले. एक अभियंता पाहणी दौऱ्यादरम्यान चक्कर येऊन पडला होता. आणखी एका अभियंत्यावर रुग्णालयात उपचार सुरु असून त्याला ब्रेनस्ट्रोक झाल्याचे समजते. यानिमित्ताने दुहेरी कामाचा ताण पडत असल्याने अभियंत्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागल्याची चर्चा पालिका वर्तुळात सुरू आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** वाढत्या लोकसंख्येमुळे ठाणे महापालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरील वाढलेला ताण कमी करण्यासाठी राज्य शासनाने आकृतीबंधला मंजुरी दिल्याने ८८० वाढीव पद भरतीचा मार्ग मोकळा झाला होता. असे असले तरी, अद्याप भरती प्रक्रिया होऊ शकलेली नसून यामुळे शहरातील विकास कामांत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागातील मंजूर ३०० पैकी १६६ अभियंत्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे कार्यरत अभियंत्याना दुहेरी पदाचा ताण सहन करावा लागत असून यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागल्याची चर्चा पालिका वर्तुळात दबक्या आवाजात सुरू आहे.

ठाणे महापालिकेची स्थापना १९८२ मध्ये झाली असून ही 'ब' वर्ग महापालिका आहे. ठाणे महापालिकेत शिक्षण मंडळासह ९०८८ तर परिवहन सेवेत दोन हजार सहाशे कर्मचारी आहेत. तसेच सुमारे अडीच हजार कंत्राटी कामगार आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार ठाणे महापालिकेची लोकसंख्या १८ लाख ४१ हजार इतकी आहे. ही लोकसंख्या आता २५ लाखांच्या पुढे गेली आहे. गेल्या काही वर्षात पालिका क्षेत्राचे विस्तारीकरण झाले आहे.

या क्षेत्रात घोडबंदर सारखा परिसर नवे ठाणे म्हणून उदयास आला आहे. मोठ मोठी गृहसंकुले उभी राहत असून घोडबंदर भागात हे प्रमाण मोठे आहे. एकीकडे शहराचे नागरीकरण वाढत असून या नागरिकांना मूलभूत सेवासुविधा पुरविण्याची जबाबदारी असलेल्या पालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडू लागली आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे ठाणे महापालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरील वाढलेला ताण कमी करण्यासाठी राज्य सरकारने आकृतीबंधमध्ये ८८० वाढीव पदांना मंजुरी दिली. पण, ही भरती काही कारणास्तव होऊ शकलेली नाही. त्यातच अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सेवानिवृत्त झाले आहेत. यामुळेच पालिकेत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यानेच सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कामाचा दुहेरी ताण वाढला आहे. ठाणे शहरातील विकास कामात सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता महत्वाची भूमिका बजावतात. शहरात नागरी प्रकल्पांची आखणी करून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम अभियंते करतात. पाणी पुरवठा, रस्ते सुस्थितीत ठेवणे, अशी महत्वाची जबाबदारी त्यांच्याकडे असते.

ठाणे महापालिकेत ३०० मंजुर पदांपैकी १६६ पदे रिक्त असून केवळ १३४ पदांवर अभियंते कार्यरत आहेत. यामध्ये कनिष्ठ अभियंता (१) या संवर्गातील मंजुर १२६ पदांपैकी ४६ पदे कार्यरत असून ८० पदे रिक्त आहेत. कनिष्ठ (२) या संवर्गताली मंजुर ६८ पदांपैकी २ पदे कार्यरत असून ६६ पदे रिक्त आहेत.

# पेण प्रेस क्लब तर्फे प्रगतशील शेतकऱ्यांचा सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड प्रेस क्लब अंतर्गत पेण प्रेस क्लब तर्फे तालुक्यातील प्रगतशील शेतकरी सापोली येथील अनिल चंद्रकांत काणेकर, व भाल येथील चंद्रकांत म्हात्रे या दोन शेतकऱ्यांचा सपत्नीक शाल, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र, देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर तालुका नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, कृषी अधिकारी सागर वाडकर, रायगड प्रेस क्लबचे जिल्हाध्यक्ष प्रशांत गोपाळे, माजी जिल्हा अध्यक्ष विजय मोकल, लहुशेठ पाटील, एस.एच.गायकवाड, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष प्रशांत गोपाळे यांनी सांगितले की, पेण प्रेस क्लब आयोजित शेतकऱ्यांचा सत्कार हा शेताच्या बांधावरचा उपक्रम आहे. आम्ही रायगड प्रेस क्लब तर्फे प्रोत्साहन देण्यासाठी हा सत्कार करतो. शेतीसह इतर फळपिके, मत्स्य शेती करणाऱ्यांची माहिती घेऊन त्यातून दोघांची निवड करतो. शेतकरी टिकला तरच हा देश टिकेल, असे सांगतानाच, रस्ते महामार्गासाठी आंदोलन केली, करत आहोत, असे जिल्हा प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांनी येथे संगितले.

तर कृषी अधिकारी सागर वाडकर यांनी सांगितले की, सामाजिक बांधिलकी ठेऊन पत्रकार काम करत आहेत. शेतकऱ्यांचा सन्मान करत आहेत ही चांगली बाब आहे. शासनाने शेतकऱ्यांसाठी विविध योजना आणल्या आहेत. केंद्र व राज्य शासनतर्फे उत्तम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अनेक योजना पुरस्कार आणत आहेत. असे तालुका कृषी अधिकारी सागर वाडकर यांनी सांगितले. तसेच प्रगतशील शेतकरी अनिल काणेकर आणि चंद्रकांत म्हात्रे यांनी सत्कारानंतर आपले शेतीतील अनुभव व अपेक्षा व्यक्त केल्या. सदर कार्यक्रमाविषयी प्रास्ताविक कमलेश ठाकूर यांनी तर आभार विजय मोकल यांनी मानले.

# महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांची सलग दुसऱ्या दिवशी स्वछता कामांची पाहणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सततच्या पर्जन्यवृष्टीमुळे उद्भवणाऱ्या साथ रोगाच्या पार्श्वभुमीवर अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी काल 1/अ प्रभाग क्षेत्रातील साफ-सफाईची पाहणी केली होती. आजही अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी 3/क प्रभाग क्षेत्रातील गजानन महाराज मंदिर परिसर, साईबाबा नगर, प्रभाग क्र.29 मधील गुलमोहर सोसायटी, सद्गुरु कृपा कॉलनी, श्री कृष्ण कॉलनी, प्रभाग क्र.28 मधील शकुंतला भवन, खंडेलवाल कॉलनी, क्वालिटी कंपाऊंड व गांवदेवी मंदिर परिसर इ. ठिकाणी समक्ष भेट दिली. यावेळी सुमारे 200 कंटेनरची पाहणी केली असता, 30 कंटेनरमध्ये डासांच्या अळ्या



(LARVAE) आढळुन आल्या. अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी संबंधित परिसरातील नागरीकांना पाण्याचा जास्त काळ साठा केल्यामुळे उद्भवणाऱ्या साथरोगांबाबत मार्गदर्शन केले. रोकडे कॉलनी आणि पंचमुखी मारुती मंदिर परिसरातील तीन बांधकामांच्या ठिकाणी डेंग्युच्या डास अळया



(LARVAE) सापडल्यामुळे महापालिकेकडून रुपये 25,000/- इतका दंड आकारण्यात आला आहे.

## केडीएमसीतर्फे वारसाहक्काने
# ११४ वारसदारांना नियुक्ती पत्र प्रदान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसाहक्काच्या अंमलबजावणीबाबत शासन निर्णय, परिपत्रक व शासन पत्रातील नमूद तरतूदीच्या अनुषंगाने महापालिकेच्या सफाई कामगार या पदावर कार्यरत असलेले कर्मचारी हे सेवानिवृत्त/स्वेच्छासेवानिवृत्त/मयत/वैद्यकीय दृष्ट्या अपात्र झाल्यानंतर त्यांच्या वारसदारांनी सादर केलेली कागदपत्रे आणि शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवून, या वारसदारांना लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती देणेबाबत पात्र ठरविण्यात आले आहे.





वैद्यकीय दृष्ट्या पात्र व चारित्र्य आणि पुर्व चारित्र्य पडताळणी अंती पात्र ठरलेल्या एकुण 114 वारसदारांना त्यांच्या शैक्षणिक अहर्तेनुसार त्यांना आज महापालिका आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, सामान्य प्रशासन विभागाच्या उपआयुक्त वंदना गुळवे यांच्या हस्ते नियुक्तीचे आदेश देण्यात आले. यामध्ये 1 भुमापक, 24 लिपिक, 34 शिपाई, 55 सफाई कामगार या पदांवर एकुण 114 वारसदारांना नियुक्तीचे आदेश वितरित करण्यात आले.




# ‘स्वराज्य तोरण’ चे संपादक डॉ. किशोर पाटील यांना राज्यस्तरीय पुरस्कार

## निर्भीड लेखन, सामाजिक भान आणि ग्रामीण पत्रकारितेतील योगदानाची राज्यस्तरीय पातळीवर दखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मराठी पत्रकारितेतील वैचारिक स्पष्टता, सामाजिक बांधिलकी आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने लेखणी चालवणारे दैनिक ‘स्वराज्य तोरण’ चे संपादक डॉ. किशोर बळीराम पाटील यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्यावतीने गुणगौरव पुरस्कार 2025 ने सन्मानित करण्यात आले. ठाण्यात शनिवार, दि. १२ जुलै २०२५ रोजी टाऊन हॉल, कोर्ट नाका येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळा व पत्रकार मेळाव्याच्या निमित्ताने हा मानाचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर राज्य कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, सरचिटणीस जगदीश सोनवणे, राज्य उपाध्यक्ष डॉ. दिलीप कोठावदे, कोकण विभाग संघटक अरुण बिराजदार, राज्य सल्लागार



प्रमोद इंगळे, ठाणे जिल्हाध्यक्ष शंकर करडे, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेंद्र बोडके, आणि कार्यक्रमाचे आयोजक व ठाणे शहर जिल्हाध्यक्ष नितीन मनोहर शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. पाटील यांनी गेल्या दोन दशकांहून अधिक काळ ग्रामीण



**हा पुरस्कार म्हणजे केवळ माझा नव्हे, तर ग्रामीण पत्रकारितेत निष्ठेने काम करणाऱ्या प्रत्येक संघर्षशील पत्रकाराचा सन्मान आहे. सत्य व निष्पक्षतेच्या मार्गावर चालणाऱ्या पत्रकारितेची ही थोडीशी पावती आहे. यामुळे अधिक जबाबदारीची जाणीव झाली आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया डॉ. किशोर पाटील यांनी पुरस्कार स्वीकृतीवेळी दिली.**

पत्रकारितेच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी, दुर्लक्षित समाजघटक, तसेच सामान्यांच्या प्रश्नांना आपल्या परखड लेखणीद्वारे वाचा फोडली आहे. सामाजिक अंलबजावणी, शासकीय योजनांची कार्यवाही, प्रशासनाचा हलगर्जीपणा आणि राजकीय धोरणांवरील अभ्यासपूर्ण भाष्य ही त्यांच्या पत्रकारितेची ठळक वैशिष्ट्ये ठरली आहेत.

दैनिक स्वराज्य तोरण चे संपादक म्हणून त्यांनी केवळ वृत्तसंपादनच नाही, तर समाजप्रबोधनाचे कार्यही सातत्याने केले आहे. त्यांची लेखनशैली ठाम, समतोल आणि सुस्पष्ट असून, वाचकांमध्ये विचारप्रवृत्त करणारी आहे. या गुणवत्तेचीच दखल घेत ‘गुणगौरव पुरस्कार 2025’ देण्यात आला.

या पुरस्कार सोहळयाचा उद्देश समाजासाठी कार्य करणाऱ्या डॉक्टर, पोलीस, शिक्षक, वकील, पत्रकार आणि विद्यार्थ्यांसारख्या विविध क्षेत्रातील व्यक्तींना राज्यस्तरावर गौरविणे हा होता. त्यांच्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळावी, हा यामागचा उद्दात हेतू होता.

या राज्यस्तरीय मेळाव्याचे उत्कृष्ट आयोजन पत्रकार संघाचे राज्य संघटक व ठाणे जिल्हा शहर अध्यक्ष नितीन मनोहर शिंदे आणि त्यांच्या कार्यतत्पर टीमने केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साही आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. ठाणे जिल्ह्यातील विविध माध्यमातील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.

डॉ. किशोर पाटील यांचा ‘गुणगौरव पुरस्कार 2025’ हा त्यांच्या मूल्यनिष्ठ पत्रकारितेचा गौरव असून, हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नाही, तर संपूर्ण ग्रामीण पत्रकारितेच्या सचोटीचा अभिमान असल्याची भावना राज्यभरातून व्यक्त होत आहे.

# केडीएमसीच्या श्वान निर्बिजीकरण केंद्राची भिंत कोसळली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाच्या कृषी उत्पन्न बाजार समिती लगत असलेल्या श्वान निर्बिजीकरण केंद्राची सुरक्षा भिंत मंगळवारी सकाळी कोसळल्याची घटना घडली. यात सुदैवाने कोणतीही जिवितहानी झाली नाही. कल्याण पश्चिमेतील सर्वदय मुख्य नाल्यालगत मनपाचे श्वान निर्बिजीकरण केंन्द्र असून या केंन्द्रात भटक्या व मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण केले जाते. उपाचाराअंती देखभाल करीत चार दिवसाच्या कालावधी नंतर मुक्त केले जाते. या श्वान निर्बिजीकरणसाठी लाखोचा खर्च वर्षाकाठी मनपा करते. या केंद्राची सुरक्षा भिंत कोसळल्याची घटना मंगळवारी सकाळी आठ साडे आठच्या सुमारास घडली. मुख्य नाल्यालगत हे केंद्र असल्याने या सुरक्षा भिंतीचे काम देखील त्या दर्जाचे होणे गरजेचे होते. सुरक्षा भिंत कोसळल्याने निर्बिजीकरण साठी आणलेल्या श्वानांना बाजूच्या रिकाम्या बँरिगेट मध्ये हलविण्यात आले असल्याची माहिती अधिकारी सूत्रांकडून प्राप्त झाली असून सुरक्षा भिंत कोसळल्याने कामाच्या दर्जासह देखभाल दुरूस्ती प्रश्न यानिमित्ताने ऐरणीवर आला असल्याचे चित्र दिसत आहे.



टिटवाळा आणि मुरबाड कल्याण हायवेच्या सर्व बारमालकांचा

## महाराष्ट्र बंद मध्ये उत्स्फूर्त सहभाग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : टिटवाळा आणि मुरबाड कल्याण हायवेच्या सर्व बारमालकांनी सोमवार दिनांक १३ ला आहार व महाराष्ट्रातील सर्व हॉटेल्स एंड बार असोशियन ने घोषित केलेल्या महाराष्ट्र बंद मध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आणि सर्व परमिट रूम बार पूर्णवेळ बंद ठेवले.शासनाने काहि कालवधी आधीच VAT टैक्स दुप्पट केला होता आणि २०२५-२६ कालावधीच्या परवाना नूतनीकरण शुल्क मध्ये ही १५% वाढ केली होती आणि त्यात भर म्हणजे जुलै २०२५ पासून उत्पादन शुल्क ५०% ते ६०% टक्क्यांनी वाढवल्यामुळे दारूच्या MRP मध्ये लक्षणीय वाढ झाली आहे , तर अश्या परिस्थितीत हॉटेल चालकमालक कसे काय मार्ग काढतील. तसेच टिटवाळा आणि कल्याण-मुरबाड हाईवे रोडवर अवैध दारू विक्री आणि धाब्यांवर सर्रासपणे दारू विक्री चालू असते, मग परमिट रूम व बार वाल्यानी शासनाला इतक्या मोठ्या प्रमाणात उत्पादन शुल्क देऊन काय उपयोग ह्या बंद मध्ये टिटवाळा व कल्याण-मुरबाड रोड ह्या ग्रामीण भागातील मधील सर्व बार व परमिट रूमधारक सहभागी होते

## प्रधानमंत्री पीकविमा योजनेच्या भित्तिपत्रकाचे अनावरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : खरीप हंगाम 2025-26 मधील राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत आयोजित कार्यशाळेत प्रधानमंत्री पीकविमा योजनेच्या भित्तिपत्रकाचे अनावरण खासदार श्रीरंग बारणे, खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील यांच्याहस्ते काल नियोजन भवन येथे करण्यात आले. यावेळी आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे, उप व्यवस्थापक मुंबई भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई सौ. शिल्पी मिश्रा, जिल्हा प्रतिनिधी रायगड पुरुषोत्तम सरनाईक, अलिबाग तालुका प्रतिनिधी राहुल लांडगे आदि उपस्थित होते. पीक पेरणीपासून ते काढणीपर्यतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक किड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी करणांमुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे उत्पादन हे त्या महसूल मंडळासाठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळातील त्या पिकाच्या विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना समप्रमाणात नुकसानभरपाई मिळणार आहे. यावर्षी राज्य शासनातर्फे पीकविमा योजनेमध्ये अत्यंत चांगले बदल करण्यात आले असून ते शेतकऱ्यांच्या हिताचे आहे. पिकविमा योजनेबद्दल शेतकऱ्यांचे असलेले गैरसमज दूर करण्यामध्ये सगळ्यांनी आपले योगदान द्यावे. तसेच पिक विमा योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना घ्यावा, असे अहवान यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील शेतकरी तसेच कृषि विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## पूर रेषेसंदर्भातील ब्ल्यू लाईनबाबत पुन्हा सर्वेक्षण

### - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई: राज्यातील नद्यांच्या किनारी असलेल्या पूर रेषेसंदर्भात असलेल्या ब्ल्यू लाईन बाबत महसूल आणि जलसंपदा विभागामार्फत पुन्हा सर्वेक्षण केले जाईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य ॲड. अनिल परब यांनी बदलापूर जवळील उल्हास नदी पात्रात होत असलेल्या अतिक्रमणाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, सतेज पाटील, डॉ. मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, नदी किनारी असलेल्या क्षेत्रातील माती उत्खनन करुन उल्हास नदीपात्रात टाकत असल्याचे निदर्शनास आले होते. त्या अनुषंगाने गौण खनिजासाठी आणि वापरण्यात आलेल्या यंत्रसामग्रीसाठी एकूण १० कोटी १६ लाख १७ हजार १४१ एवढ्या दंडात्मक रकमेचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच यामध्ये वापरण्यात आलेली यंत्रसामग्री जप्त करण्यात आली आहे. हा दंड वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दहिसर येथे गणपत पाटील नगर परिसरात भराव टाकला जात असल्याबाबतच्या एका उपप्रश्नाच्या उत्तरात येथे तीन दिवसात महसूल विभागाचे अधिकारी जाऊन चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करतील, असे मंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे कोकण विभागातील समुद्र किनारा आणि नदी किनारी महसुली जागेवर अनेक ठिकाणी झालेले अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सुरू असून अतिक्रमण केलेल्या सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात येईल, असेही महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

भिवंडी मनपात

## टीबी मुक्त आरोग्य शिबीर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिका अंतर्गत मंगल भवन कामतघर नागरी आरोग्य केंद्र येथे दिनांक ११.०७.२०२५ रोजी टीबी मुक्त अभियान योजने अंतर्गत कामतघर नागरी आरोग्य केंद्र व संस्था इंडियन वूमन एण्ड चिल्ड्रन फाउन्डेशन भिवंडी यांच्या संयुक्त विद्यमाने क्षयरोग जोखीमग्रस्त लोकसंख्येची तपासणी, मागील पाच वर्षात TB झालेली व्यक्ती, TB रुग्णांच्या संपर्कात असणारे व्यक्ती, ६० वर्ष वरील व्यक्ती, बॉडी मास इंडेक्स (BMI) १८ किलोग्रम / मीटर स्क्वेअर पेक्षा कमी असलेली व्यक्ती, सिगारेट किंवा बिडी ओढणाऱ्या व्यक्ती, मधुमेह असणारे व्यक्ती यांच्या तपासणी करिता आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर आरोग्य शिबीर कार्यक्रम भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त सो. श्री. अनमोल सागर (भा.प्र.से.) यांच्या आणि मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाले.

भिवंडी मनपाचे शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बुशरा सय्यद यांनी क्षयरोग बद्दल माहिती दिली. भिवंडी मनपा चे शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बुशरा सय्यद, इंडियनं वूमन एण्ड चिल्ड्रन फाउन्डेशनचे संचालक श्री. प्रभाकर जाधव, आपला दवाखानाचे डॉ. रवीना आरेकर, भिवंडी क्षयरोग विभागाचे डीस्ट्रीक कॉर्डीनेटर श्री. अनिल गुप्ता, STLS श्री. मोबीन शेख, कामतघर ना. आरोग्य केंद्र येथील कर्मचारी, आशा वर्कर, समाजसेवक तसेच क्षयरोग विभाग व कामतघर ना. आरोग्य केंद्र येथील कर्मचारी उपस्थित होते.

# म्हारळ गावातील नागरिकांना तुंबलेल्या नाल्याचा धोका

## म्हारळ ग्रामपंचायत सदस्यांची तक्रार!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**४०० ते ५०० कुटुंबाना धोका**

कल्याण : उल्हासनगर पालिका हद्दीतून जाणारा नाला अंत्यत अरुंद असल्याने तो तुंबून यामुळे म्हारळ गावातील सुर्यानगरपासून ते म्हारळसोसायटी पर्यंत पाणी भरत असल्याने या परिसरातील सुमारे ४०० ते ५०० कुंटूब, घरे यांना धोका निर्माण होत असून ऐवढेच नव्हे तर कल्याण मुरबाड महामार्ग देखील येथे बंद होतो,या विरोधात म्हारळ ग्रामपंचायतीचे सदस्य तथा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे म्हारळ शहर प्रमुख प्रकाश चौधरी यांनी पालिका अधिका-यांना भेटून निवेदनेही दिले आहे परंतु अद्याप यावर काही कारवाई झाली नाही, त्यामुळे या नागरीकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. कल्याण तालुक्यातील म्हारळ गाव हे उल्हास नदीच्या काठावर वसलेले आहे, गावातील मुख्य नाला तसेच सुर्यानगर भागातून जाणार हा १० ते १२फुंटाचा नाला पावसाळयात तसेच इतर वेळी पाणी वाहून नेण्याचे काम करतो, या नाल्याच्या आजुबाजुला अनेक लोकवस्ती झाली आहे, शिवाजी नगर, राऊत वस्ती, तसेच प्रिती अँकेडमी शाळा, म्हारळ सोसायटी, यांचा समावेश होतो, पुढे हा नाला कल्याण मुरबाड महामार्ग क्रॉस करुन उल्हासनगर पालिका हद्दीतून जाऊन उल्हास नदीस मिळतो, परंतु सुर्यानगर पासून १० फुंटाचा आलेला नाला पुढे एल टाईप केवळ २ते अडीच फुटांचा असल्याने संपूर्ण म्हारळ परिसरातून आलेले पाऊसाचे पाणी तुंबते व तो फुगवटा मागे येतो, यामुळे वार्ड नंबर ४ मधील ४०० ते ५००घरात हे पुराचे पाणी शिरते, त्यामुळे येथील नागरिकांना जीव मुठीत धरून जगावे लागते, विशेष म्हणजे येथे शाळा असल्याने शाळकरी मुलांना देखील धोका संभवतो. शिवाय कल्याण मुरबाड महामार्गावर येथे पाणी भरल्याने तो बंद होतो. प्रत्येक वर्षी पावसाळयात या लोकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो, त्यामुळे या परिसराचे नेतृत्व करणारे म्हारळ ग्रामपंचायतीचे सदस्य तथा शिवसेना (उबाठा) पक्षाचे म्हारळ शहर प्रमुख प्रकाश चौधरी यांनी कल्याण शहर प्रमुख धनंजय बोडारे यांच्या नेतृत्वाखाली पालिका आयुक्त व पदाधिकारी यांच्या सोबत बैठक घेऊन निवेदने दिली, त्यांच्या कडून नाला रुंदीकरण करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला, मात्र प्रत्यक्षात कृती काय झाली नाही?त्यामुळे या वेळी देखील येथील ग्रामस्थांना आर्थिक व जीवीत हानीला समोर जांव लागणार आहे, त्यामुळे या भागाचे नेतृत्व करणारे लोकप्रतिनिधी, पालिका आयुक्त, आणि शासनाने या गंभीर घटनेकडे गांभीर्याने लक्ष घालून येणारा संभाव्य धोका टाळावा अशी मागणी जनतेमधून होत आहे.

## प्राणी मित्रांनी केली ९ फुटाच्या अजगराची सुटका

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : स्थानिक सर्प मीत्रांच्या सहकार्याने भंडार्ली गावातील एका जनावरांच्या गोठ्यात लपलेल्या 9 फुटाच्या अजगराची सुटका करण्यात आली असून ठाणे वनविभाच्या अंतर्गत ट्रान्सिट ट्रिटमेंट सेंटर यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच निसर्गमुक्त करण्यात आले. गोठ्यातील वासरे किंवा रेडकू हे आहारासाठी सहज शिकार आहे. अजगर गवताच्या पेंढ्यात आहे हे लक्षात येताच गोठ्याच्या मालकाने सर्पमित्रांना संपर्क केला. स्थानिक सर्पमित्र विजय राजभोर, विशाल कंथारिया, संतोष पंडागळे, कुलदीप चिकणकर यांनी गोठ्यातील अजगराचा शोध घेऊन वन विभागाच्या मार्गदर्शनाने निसर्गात मुक्त केले.

## टोकावडे येथे शेतकरी संघर्ष समितीचं आमरण उपोषण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




मुरबाड : राष्ट्रीय महामार्ग 61 वर कल्याण-माळशेज घाट रस्त्याच्या रुंदीकरणासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने टोकावडे नाका येथे सोमवार ता. 14 रोजी आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रकाश पवार, माजी जि.प. सदस्य संजय पवार, रमेश हिंदुराव, काळूराम घोलप, सुहास पवार, विलास घरत, रोहित बोराडे, विशाल घरत आदींच्या नेतृत्वाखाली तिवारपाडा, मानिवली, टोकावडे, बोराडपाडा, तळवली, वैशाखरे, मोरोशी, फांगुळगाव या गावांतील बाधित शेतकरी उपोषणात सहभागी झाले आहेत.

शासनाने 2013 च्या अधिनियमानुसार योग्य अधिसूचना व मोबदला दिल्याशिवाय जमिनीचा ताबा घेणे बेकायदेशीर असल्याचे समितीचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांच्या या उपोषणाला जि.प. ठाणे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार, जि.प.मा. उपाध्यक्ष सुभाष घरत, पं.स. माजी उपसभापती अरुणाताई खाकर, माहिती अधिकार महासंघाचे पदाधिकारी आदी मान्यवरांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला. उपोषणाद्वारे शेतकऱ्यांनी संघर्षाची भूमिका घेतल्याने प्रशासनासमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे. दरम्यान उपोणावर मार्ग काढण्यासाठी मुरबाडचे तहसीलदार अभिजीत देशमुख शासनाच्या वतीने मध्यस्थी करत असून महामार्ग अधिकारी यांच्याशी संपर्क करत आहेत.

**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या**

**भूसंपादनाची अधिसूचना तातडीने जाहीर करावी, १२% व्याजासह मोबदला द्यावा, चुकीचे क्षेत्र दुरुस्त करावे, वृक्ष संपत्ती व घरांचे योग्य मोबदले द्यावेत, २५% दिलासा रक्कम मंजूर करावी.**

**राष्ट्रीय महामार्ग ६१ रुंदीकरण रस्त्याला आमचा विरोध नाही, मात्र प्रशासन व शासनाने रीतसर २०१३ च्या कलम २३ नुसार निर्णयाची कार्यवाही करून बाधित व भूसंपादित शेतकऱ्यांना त्यांचा जमिनीचा योग्य मोबदला द्यावा..**

**- प्रकाश पवार, अध्यक्ष, शेतकरी संघर्ष समिती**


# अवघ्या अडीच महिन्यात हुंड्याने दाखवली मृत्यूची वाट

## उच्चशिक्षीत ॲकेडमी केलेल्या २३ वर्षाच्या नवविवाहितीची आत्महत्या ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील धसई बाजार पेठेत वडापावची हातगाडी चालवून कुंटूबाचा गाडा सांभाळणाऱ्या केदार कुंटूंबाला हुंड्यापायि आपलि पोटचि मुलगी गमवावि लागली आहे. आपल्या मुलीचं लग्न ऐपती प्रमाणे थाटामाटात पार पाडले. १ मे २०२५ रोजी आपल्या छकूली बाळकृष्ण केदार वय 23 वर्षे हिचे लग्न किन्हवली जवळील कैलास चंद्रकात हरड मु.खरवलि कपड्याचा दुकान व्यावसायीक तरूणा सोबत लावून दिले होते. लग्नाला अवघे अडीच महिने लोटले नाहीत तोच २० लाख रूपये हूंडा आणत नाही म्हणून नवविवाहितेला गळफास घेऊन आपलं जिवन संपविण्याची वेळ आली आहे. या बाबत किन्हवली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली असून ही आत्महत्या नसून आमच्या मुलीची हत्या झाली असल्याचा आरोप तिच्या माहेरच्यांनी केला आहे.

धसई जवळील पिंपळघर येथील बाळकृष्ण केदार यांची मुलगी छकुली या मुलीचे लग्न १मे २०२५ रोजी कैलास चंद्रकांत हरड या सोबत झाले होते. हरड कुंटूबीय खरवली गावचे असून सध्या किन्हवली गुरुकुल



नगरात राहतात. आपल्या मुलीचा २० लाख रूपयांच्या लालसे पोटी या कुंटूबाने बळी घेतल्याची तक्रार मृत मुलाची आई रंजना बाळकृष्ण केदार यांनी किन्हवली पोलीस स्टेशन दाखल केले आहे, त्यात छकूलीचा पती कैलास चंद्रकांत हरड,सासु रमाबाई हरड, दिर राजेश हरड, जाऊ जयश्री हरड ह्या कुंटूबीयानी मयत छकूली कडे नविन रूम घेण्यासाठी २० लाख रूपयांची मागणी करीत तीला मारहाण करीत शारीरीक व मानसिक छळ केला जात असल्यामुळे व वडील वडापावची हातगाडी चालवून कुंटूबाचा गाडा चालवित असल्याने एवढे पैसे येणार कुठून म्हणून हि नविविहिता सारे अन्याय सहन करीत होतीं, मात्र या घटनेच्या दोन दिवस अगोदर तीने आपली कर्मकहाणी आईला फोन सांगून मला घरी घेऊन जा आता हे सहन होत नसल्याचे सांगून दि, १३/७ दुपारी २- २६वा आपल्या गुरूकुल येथील राहत्या घरातील बेडरूम मध्ये फँनला साडीने गळफास घेऊन आपलं जिवन संपविले. आपल्या मुलीने आत्महत्या केली नसून सासरच्यांनी तिचा छळ करून हत्या केली असल्याचा आरोप तिच्या आईने केला आहे. आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे व आमच्या मुलीला न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी केदार कुंटुंबाने केली आहे.

दरम्यान किन्हवली पोलीसात या घटनेचा चार जणांवर गुन्हा दाखल झाला असून पति कैलास हरड यास ताब्यात घेतले असून ईतर आरोपी फरार आहेत.

## सोनसाखळी चोर जेरबंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण : कोळसेवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत सोमवारी सकाळी ६ वा. कल्याण पूर्वेतील गणेशवाडी येथील सरस्वती विदया मंदिर शाळेजवळ ४८ वर्षीय ईला बरून घोष, या कचरा कुंडीत कचरा टाकुन घरी परत जात असताना एका अनोळखी इसमाने त्यांच्या गळयातील ८ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन खेचुन पसार झाला होता. याप्रकरणी घोष यांच्या तक्रारीवरून कोळसेवाडी पोलीसांनी गुन्हा दाखल केला होता. या गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक संदिप भालेराव व त्यांचे पथक करीत असताना या गुन्हयाच्या घटनास्थळी मिळुन आलेले सीसीटीव्ही फुटेजद्वारे आरोपीचे नाव निष्पन्न करून आरोपी प्रितम जाधव, वय ३१, याला गुन्हयात अटक करून गुन्हयातील ८ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन हस्तगत करण्यात आली आहे.

## मादक पदार्थांच्या साठ्यासह मुद्देमाल जप्त

### शहापूर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : मुंबई- नाशिक महामार्गावरील मौजे आटगांव हद्दीतील एका धाब्याजवळ विक्रीसाठी आलेल्या दोन इसमांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून गांजा, अंमली पदार्थ व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार 12 जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी आपल्या पथकासह गुन्हेगार पाहणी गस्त घालत असताना गुप्त माहितीदार यांच्या मिळालेल्या खबरी नुसार शहापूर पोलिस ठाण्यात हद्दीतील मौजे आटगांव गांव हद्दीत असलेल्या गुरुनानक धाब्याजवळ असलेल्या गांजा, अंमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्यांवर छापा टाकण्यात आला. यामध्ये रोहन रायगुडे व कुणाल घाटोळे (रा. चाळीसगाव, धुळे) या दोन इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्या जवळील असलेला 10 किलो वजनी गांजा, अंमली पदार्थ व स्कुटी, मोबाईल असे मिळून 4 लाख 10 हजार किंमतीचा




मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ.डी.एस. स्वामी, अप्पर पो.अधिक्षक भारत तांगडे यांच्या आदेश व सुचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक महेश कदम यांच्या समवेत पो.उप.नि. दिपेश केणी, पो.उप.नि.भाऊसाहेब गायकवाड, पो.ह. प्रकाश साईल, संतोष सुर्वे, भगवान सोनवणे, सतिश कोळी, गोविंद कोळी, पो.शि. स्वप्निल बोडके यांच्या पथकाने केली आहे. तर याबाबत पो.ह. संतोष सुर्वे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून याबाबत गुन्हा नोंद करण्यात आली आहे.




# पारितोषिके आणि नोकऱ्यांमध्ये खेळाडूंची उपेक्षा

## आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांची सभागृहात लक्षवेधी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : आंतरराष्ट्रीय खो-खो महासंघाने भारतीय खो-खो महासंघाच्या आयोजनाखाली व इंदिरा गांधी स्टेडियम दिल्ली येथे पहिल्या वर्ल्डकप खो-खो स्पर्धेचे आयोजन दिनांक 13 ते 16 जानेवारी 2025 या कालावधीत करण्यात आले होते. या पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेकरता महाराष्ट्र शासनाने दहा कोटी रुपये मंजूर केले होते. सदरची रक्कम स्पर्धेसाठी त्वरित अदा करण्यात आलेली होती. पहिल्या विश्वचषक स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष व महिला खेळाडूंनी या स्पर्धेतील सुवर्णपदक पटकवले तसेच भारताला वर्ल्ड कप जिंकून दिला आहे. सदरचे खेळाडूंना पुरस्काराची रक्कम व प्रथम दर्जाची नोकरी न मिळाल्याने शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी सदरचा प्रश्न सभागहात मांडून वाचा फोडली आहे.

महाराष्ट्र राज्यातील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख पारितोषिक देऊन गौरवण्यात येणाऱ्या योजनेकरिता शासनाने दिनांक 7 ऑक्टोबर 2024 रोजी शासन निर्णय पारित केला आहे. या शासन निर्णयाला अनुसरून महाराष्ट्रातील सुवर्णपदक प्राप्त पुरुष व महिला खेळाडू आणि त्यांच्या मूळ मार्गदर्शकांचे विहित नमुन्यातील अर्ज क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्याकडे वेळेत सादर करण्यात आले आहे. परंतु अद्यापही या खो-खो खेळातील पहिल्या विश्वचषक स्पर्धेतील सुवर्णपदक प्राप्त खेळाडूंना आज पर्यंत पुरस्काराची रक्कम मिळाली नाही. तसेच खेळाडूंना प्रथम दर्जाची नोकरी सुद्धा देण्याचे आश्वासित केले होते. पर्यंत त्याची कार्यवाही झालेली नाही म्हणून कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांनी सदरची माहिती पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन द्वारे विधिमंडळात मांडून शासनाचे लक्ष वेधलेले आहे. व तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे राज्यातील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त (वर्ल्ड कप विजेते) खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना दिलासा मिळाला आहे.

Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.